**पंतप्रधान श्री.नरेंद्र मोदींचे 14 व्या भारत-फ्रान्स सीईओ मंचाला संबोधन (11 फेब्रुवारी 2025)**

11 फेब्रुवारी, 2025

पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि फ्रान्सचे महामहिम राष्ट्राध्यक्ष इमॅन्युएल मॅक्रॉन यांनी आज पॅरिसमध्ये 14 व्या भारत-फ्रान्स सीईओ मंचाला संयुक्तपणे संबोधित केले. संरक्षण, अंतराळ, महत्वपूर्ण आणि उदयोन्मुख तंत्रज्ञान, पायाभूत संरचना, प्रगत निर्माण, कृत्रिम बुद्धिमत्ता, जीवन-विज्ञान, आरोग्य आणि जीवनशैली, खाद्य आणि आतिथ्य सारख्या महत्वपूर्ण क्षेत्रांवर लक्ष्य केंद्रित करुन ह्या मंचाच्या माध्यमातून उभय बाजूंचे विविध कंपनी समूहांचे सीईओ एका मंचावर उपस्थित होते.

2. पंतप्रधानांनी आपल्या भाषणात भारत-फ्रान्स व्यापार आणि आर्थिक सहयोगाचा वाढता विस्तार आणि यामुळे उभय देशांतील धोरणात्मक भागीदारीला नवी गती मिळत असल्याचा उल्लेख केला. भारतामधील स्थिर राजकीय स्थिती आणि आशावादी धोरणात्मक पारिस्थितिकी मुळे गुंतवणुकीसाठी जागतिक आकर्षणाचे केंद्र ठरत असल्याची बाब पंतप्रधानांनी अधोरेखित केली.  नुकत्याच सादर करण्यात आलेल्या अर्थसंकल्पातील तरतूदींवर बोलताना पंतप्रधान म्हणाले, विमा क्षेत्र 100% थेट विदेशी गुंतवणूक (FDI) साठी तसेच SMR आणि AMR तंत्रज्ञानाला प्राथमिकता देताना नागरी आण्विक क्षेत्र खासगी गुंतवणुकीसाठी खुले करण्यात आले आहे. सीमाशुल्क दराची रचना तर्कसंगत करण्यात आली आहे; आणि जीवन सुलभतेसाठी सरलीकृत प्राप्तिकर संहिता आणली जात आहे.  सरकारच्या सातत्यपूर्ण सुधारणा करण्याच्या वचनबद्धतेचा उल्लेख करताना पंतप्रधान म्हणाले, विश्वासावर आधारित आर्थिक सुशासन स्थापना करण्याच्या हेतूने एक उच्च स्तरीय समिती गठित करण्यात आली आहे. त्याअंतर्गत गेल्या काही वर्षांमधील 40,000 हून अधिक अनुपालनांना तर्कसंगत बनविण्यात आले आहे.

3. संरक्षण, ऊर्जा, महामार्ग, नागरी उड्डाण, अंतराळ, आरोग्यसेवा, फिनटेक आणि शाश्वत विकास इ. क्षेत्रात भारताच्या विकास गाथेमुळे निर्माण झालेल्या संधींचा फ्रान्सच्या कंपन्यांनी लाभ घ्यावा असे आवाहन पंतप्रधानांनी केले. भारताचे कौशल्य, प्रतिभा आणि नवोपक्रम सहित सध्या सुरू करण्यात आलेले एआय, सेमीकंडक्टर, क्वांटम, महत्वपूर्ण खनिजे आणि हायड्रोजन संबंधित नवीन मोहिमांना जागतिक स्तरावर मिळालेला पाठिंबा आणि त्यामधील जागतिक स्वारस्य अधोरेखित करताना पंतप्रधान मोदी यांनी फ्रान्स मधील उद्योजकांना परस्पर विकास तथा समृद्धी साठी भारतासोबत भागीदारी करण्याचे आवाहन केले.  उभय देशांची नवोपक्रम, गुंतवणूक आणि तंत्रज्ञान आधारित भागीदारीला प्रोत्साहन देण्याची वचनबद्धता अधोरेखित करताना त्यांनी या क्षेत्रातील सक्रिय भागीदारीचे महत्व अधोरेखित केले.  पंतप्रधांनांचे संपूर्ण संबोधन येथे पाहू शकता

4. फ्रान्सचे युरोप आणि परराष्ट्र मंत्री महामहिम जीन-नोएल-बॅरोट, फ्रान्सचे अर्थव्यवस्था, अर्थ आणि उद्योग आणि डिजिटल सार्वभौमत्व मंत्री महामहिम एरिक लोम्बार्ड सहित परराष्ट्र मंत्री डॉ. एस जयशंकर यांनी मंचाला संबोधित केले.

5. या बैठकीला उपस्थित असलेले उभय बाजूंचे मुख्य कार्यकारी अधिकारी पुढीलप्रमाणे:

**भारत:**

| अनु.नं | कंपनीचे नाव (क्षेत्र) | पद आणि नाव |
|---|---|---|
| 1 | ज्युबिलंट फूडवर्क्स/ज्युबिलंट<br>लाईफ सायन्सेस, खाद्य आणि पेय पदार्थ | हरी भरतिया,<br>सह-अध्यक्ष आणि संचालक |
| 2 | सीआयआय | चंद्रजीत बॅनर्जी, महासंचालक |
| 3 | तितागढ रेल सिस्टिम्स लिमिटेड (TRSL)<br>रेल्वे आणि पायाभूत सुविधा | उमेश चौधरी,<br>उपाध्यक्ष आणि व्यवस्थापकीय संचालक |
| 4 | भारत लाईट अँड पॉवर प्रायव्हेट लिमिटेड<br>नवीकरणीय ऊर्जा | तेजप्रीत चोप्रा,<br>अध्यक्ष आणि मुख्य कार्यकारी अधिकारी |
| 5 | पी मफतलाल ग्रुप<br>वस्त्रोद्योग आणि औद्योगिक उत्पादने | विशाद मफतलाल,<br>अध्यक्ष |
| 6 | बॉट<br>ग्राहकोपयोगी इलेक्ट्रॉनिक्स (वेअरेबल्स) | अमन गुप्ता<br>सह-संस्थापक |
| 7 | दलित इंडियन चेंबर ऑफ कॉमर्स अँड इंडस्ट्री (डिक्की)<br>व्यवसाय समर्थन आणि समावेशन | मिलिंद कांबळे<br>संस्थापक/अध्यक्ष |
| 8 | स्कायरुट एअरोस्पेस<br>एअरोस्पेस, अंतराळ आणि तंत्रज्ञान | पवन कुमार चंदना<br>सह-संस्थापक |
| 9 | अग्नीकुल<br>एअरोस्पेस, अंतराळ आणि तंत्रज्ञान | श्रीनाथ रविचंद्रन,<br>सह-संस्थापक व मुख्य कार्यकारी अधिकारी |
| 10 | टाटा ॲडव्हान्स्ड सिस्टीम्स लि<br>एरोस्पेस आणि संरक्षण | सुकरण सिंह, व्यवस्थापकीय संचालक |
| 11 | यूपीएल ग्रुप,<br>कृषीरसायने आणि कृषीव्यवसाय | विक्रम श्रॉफ<br>उपाध्यक्ष आणि सह-मुख्य कार्यकारी अधिकारी |
| 12 | सुला वाईनयार्डस,<br>खाद्यपदार्थ आणि पेय | राजीव सामंत<br>मुख्य कार्यकारी अधिकारी |
| 13 | डायनॅमिक टेक्नॉलॉजीज लि,<br>एरोस्पेस आणि संरक्षण तसेच अभियांत्रिकी | उदयंत मल्होत्रा<br>मुख्य कार्यकारी अधिकारी आणि व्यवस्थापकीय संचालक |
| 14 | टाटा कन्सल्टिंग इंजिनीअर्स (TCE)<br>इंजिनीअरिंग अँड कन्सल्टिंग | अमित शर्मा<br>व्यवस्थापकीय संचालक व मुख्य कार्यकारी अधिकारी |
| 15 | नायका<br>सौंदर्य प्रसाधने आणि ग्राहकोपयोगी वस्तू | फाल्गुनी नय्यर<br>मुख्य कार्यकारी अधिकारी |

**फ्रान्स:**

| अनु.नं | कंपनीचे नाव (क्षेत्र) | नाव आणि पद |
|---|---|---|
| 1 | एअरबस<br>एरोस्पेस आणि संरक्षण | गुईलेम फरे,<br>मुख्य कार्यकारी अधिकारी |
| 2 | एअर लिक्विड<br>रसायने, आरोग्यनिगा आणि तंत्रज्ञान | फ्रांकॉईज जॅको<br>मुख्य कार्यकारी अधिकारी व एअर लिक्विड ग्रुपच्या संचालक मंडळाचे सदस्य |
| 3 | ब्ला ब्ला कार<br>वाहतूक आणि सेवा | निकोलस ब्रुसन<br>मुख्य कार्यकारी अधिकारी व सहसंस्थापक |
| 4 | कॅपजेमिनी ग्रुप<br>माहिती तंत्रज्ञान आणि अभियांत्रिकी | ऐयमान इज्जात<br>मुख्य कार्यकारी अधिकारी |
| 5 | डॅनॉन<br>खाद्यपदार्थ आणि पेय | अँटोनी दी सेंट आफ्रिकेई<br>मुख्य कार्यकारी अधिकारी |
| 6 | इ डी एफ<br>ऊर्जा आणि विद्युत | लक रैमांट<br>अध्यक्ष आणि मुख्य कार्यकारी अधिकारी |
| 7 | एजिस ग्रुप<br>स्थापत्यशास्त्र आणि स्थापत्य अभियांत्रिकी | लॉरेंट जर्मेन<br>मुख्य कार्यकारी अधिकारी |
| 8 | एन्जी ग्रुप<br>ऊर्जा, नवीकरणीय ऊर्जा | कॅथेरीन मॅकग्रेकर<br>मुख्य व्यवस्थापकीय अधिकारी व एन्जी संचालक मंडळाचे सदस्य |
| 9 | लॉरिएल<br>सौंदर्यप्रसाधने आणि ग्राहकोपयोगी वस्तू | निकोलस हेरोनिमस<br>मुख्य कार्यकारी अधिकारी व संचालक मंडळ सदस्य |
| 10 | मिस्ट्राल एआय<br>कृत्रिम बुद्धिमत्ता | आर्थर मेंश<br>मुख्य कार्यकारी अधिकारी व सहसंस्थापक |
| 11 | नेवल ग्रुप<br>संरक्षण, जहाज बांधणी आणि अभियांत्रिकी | पियरे एरिक्स पोम्प्लेट<br>अध्यक्ष व मुख्य कार्यकारी अधिकारी |
| 12 | पर्नॉर्ड रिचर्ड<br>अल्कोहोल पेय, एफ एम सी जी वस्तू | अलेक्झांड्रे रिकार्ड<br>अध्यक्ष व मुख्य कार्यकारी अधिकारी |
| 13 | सफ्रान<br>एरोस्पेस आणि संरक्षण | ऑलिव्हर ऍंड्रीस<br>मुख्य कार्यकारी अधिकारी |
| 14 | सर्विअर<br>औषधे व आरोग्यनिगा | ऑलिवीअर लॉरे<br>अध्यक्ष व मुख्य कार्यकारी अधिकारी |
| 15 | टोटल एनर्जीज एसई<br>ऊर्जा | पॅट्रिक प्योने<br>अध्यक्ष व मुख्य कार्यकारी अधिकारी |
| 16 | विकॅट<br>बांधकाम | गाय सिडोस<br>अध्यक्ष व मुख्य कार्यकारी अधिकारी |

पॅरिस
11 फेब्रुवारी, 2025